# प्रकरण पाचवे

# उपसंहार

## उपसंहार

दलित आत्मकथन या साहित्यरुपातील सौ. शांताबाई कृष्णाजी कांबळे यांचे ' माझ्या जल्माचीचित्तर कथा ' हे दलित स्त्री आत्मकथनातील पहिले स्त्री आत्मकथन असल्याने व या साहित्य रुपाच्या विकासाच्या टप्प्यातील मुक्ता सर्वगोड यांचे ' मिटलेली कवाडे ' हे आत्मकथन असल्याने या दोन्ही आत्मकथनांची प्रस्तुत शोध प्रबंधिकेसाठी निवड केलेली आहे. यामध्ये तत्कालिन दलित स्त्री जीवन व सामाजिक परिस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

वरील दोन्ही आत्मकथनांचा विचार करण्यापूर्वी दलित आत्मकथनाचे स्वरुप व विकास हे पाहणे आवश्यक वाटलेवरुन पहिल्या प्रकरणामध्ये त्या दृष्टीने विचार मांडला आहे. डॉ. बाबासाहेबांच्या तत्वप्रणालीने प्रेरणा मिळालेल्या या अस्पृश्य वर्गातील दलित लेखकांनी निर्माण केलेल्या या साहित्यरुपाचा प्रथम ' आत्मनिवेदन ', 'आत्मकथा', 'आत्मस्मृति', 'आत्मचरित्र' इ. संज्ञांचा वापर करुन अभ्यास करण्यात आला. परंतु या संज्ञा ग्राह्य मानल्या असता या दलित साहित्यरुपावर पूर्णत: प्रकाश पडू शकत नसल्याने ' दलित आत्मकथन ' ही संज्ञाच वापरणे कसे योग्य आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. ' आत्म ' या विशेषणामुळे आत्मचरित्र व आत्मकथन यामध्ये साम्य दिसत असले तरी यांच्या निर्मितीमागील प्रेरणा, त्यातील जीवन-जाणिवा, त्यात दिसून येणारा समाज, लेखकाचे व्यक्तिमत्व, त्याचे वय, त्यात व्यथित होणारा काळ इत्यादि घटकांचा विचार करता यामध्ये तफावत असल्याचे दिसून येते म्हणून आत्मचरित्र व आत्मकथन निर्मिती मागील प्रेरणांचा व त्यांच्या वैशिष्टयांचा थोडक्यात विचार

मांडून आत्मकथन हे आत्मचरित्र का ठरू शकत नाही विषयी विचार मांडला आहे.

प्रकरण दोन मध्ये या दोन्ही आत्मकथनामधून दिसून येणाऱ्या तत्कालिन सामाजिक जीवनाचा आढावा घेतला आहे. या लेखिकेंनी स्वजीवनाचा आत्मशोध घेता घेता सामाजिक जीवनाचाही शोध घेतल्याने त्यातून त्यावेळच्या दलित स्त्री चे व एकंदरीत दलित समाजाचे जीवन, त्याचे दारिद्र्य, सवर्णांशी असणारे त्यांचे संबंध आणि त्यांच्या जीवनातील दाहकता यावर प्रकाश पडलेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये खेडयातील एकंदर स्त्री वर्ग शिक्षणापासून वंचित राहिल्याने त्यांच्या ठिकाणी निर्माण झालेले अज्ञान, त्यांची शिक्षणाकडे पाहण्याची संकुचित वृत्ती व परंपरावादी जीवनप्रणाली कशी होती याचेही दर्शन घडते. गावकीची किंवा तराळकीची कामे करून जीवन जगणारा हा वर्ग परावलंबित्वाचे व लाचारीचे जीवन जगत होता. पावलो पावली यांची मानहानी होत होती. त्यांच्या दुःखाचा किंवा दारिद्र्यमय जीवनाचा सवर्णांनी कधी विचारच केला नाही. जणू कांही हा समाजाचा दास आहे अशी त्यांना वागणूक मिळत असे. अनेक स्वरूपाची कामे यांच्याकडून करवून घेतली जात आणि याचा मोबदला म्हणजे बक्कळ शिव्या व भाकरीचे वाळलेले चार तुकडे यांच्या पदरात पडायचे. येथील स्त्रियांचे जीवन तर जास्तच कष्टमय असलेले पाहावयास मिळते. केवळ पोटाची आग भागविण्यासाठी एखाद्या तालेवाराच्या घरची घाण कामे शिळ्या-पाक्या अन्नासाठी करत.अंगावर धड वस्त्र नसे ,डोक्यावर केसांच टोपल बनलेल असे. गावकुसाबाहेर एखाद्या उकिरडयासारख्या जागी यांचे वास्तव्य पाहावयास मिळते. एकंदरीच्या तराळकीच्या कामात गुंतून पडलेला व लाचार जीवन जगणारा हा वर्ग यातून स्त्री सुध्दा मुक्त नव्हती. शहरात राहणारी स्त्री सुध्दा पोटासाठी अनेक रस्ते झाडण्याचे काम करी पण स्वतःच्या घराला,अंगणाला व मुलांच्या स्वच्छतेला ती मुकलेली दिसते.एखाद्या कोंबडीच्या खुराडया एवढ्या जागेत किंवा चिखलाने व घाणीने रबरबलेल्या गटाराशेजारच्या झोपडीत यासुध्दा जीवन जगत

होत्या. पण विटाळ-चांडाळाचा त्रास मात्र यांना खेड्यासारखा होत नव्हता हीच बाब येथे समाधानाची होती. झाडूकाम, पत्रे, कागद इत्यादिचे काम करुन स्वत:चे कुटुंब जगविण्याचा प्रयत्न येथील स्त्री करत असे आणि पुरुष मात्र त्यांच्या जीवावर बसून खात. पत्ते किंवा सट्टा खेळत आणि दारु पोहोचवण्याचे काम करत किंवा एखाद्या धन्देवाल्याचे नकरे बनत. पण या लोकांना चांगले काम करण्यासाठी किंवा त्यांच्यात काम करण्याची वृत्ती निर्माण करण्यासाठी कोणा पुढाऱ्यांन कधी प्रयत्नच केला नाही. कारण या वर्गास असेच अज्ञानाखाली ठेवल्याने यांचे पुढारीपण टिकणार होते असा त्यांचा विचार होता. अशा या माणूसकीच्या जीवनाला पारख्या झालेल्या स्त्री मध्ये स्वाभिमान, स्वावलंबन निर्माण करण्यासाठी त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी समाज कार्याच्या रुपाने मुक्ताबाईनी प्रयत्न केला. तर प्रौढ शिक्षणाच्या माध्यमाने शांताबाईनी प्रयत्न केला. या आधी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज यांनी या अस्पृश्य समाजाचा विकास करण्यासाठी धडपडत होते. तरीही या समाजाच्या वाट्याला पावलो पावली या ना त्या रुपाने मिटलेली कवाडे आलेली दिसतात. ती कधी सवर्णांनी बंद केल्याची दिसतात तर कधी अस्पृश्य वर्गातील सत्तेसाठी धडपडणाऱ्या पुढाऱ्यांनी बंद केलेली दिसतात. मुक्ताबाईनी आपल्या परिने खेड्यात व शहरात या समाजाची सेवा करण्याचा प्रयत्न केला. भारतीय स्वातंत्र्याने दिलेल्या लोकशाही हक्कामुळे किंवा औद्योगिक क्रांतीच्या उदयामुळे अस्पृश्यांचे जीवन सुखकर बनले खरे परंतु पूर्वीचे जीवन यातनामय असलेलेच पाहावयास मिळते. या सर्व दलित समाजाच्या विकासासाठी झटणाऱ्या डॉ.आंबेडकरांच्यावर हे फक्त महारांचे पुढारी म्हणून अस्पृश्य समाजातील इतर जातीने शिक्का मारल्यामुळे चांभार, मांग, इत्यादि समाजाने बाबांच्या कार्यास हातभार लावला नाही. यांच्या या अज्ञानाचा फायदा तत्कालीन काँग्रेस कर्त्यांनी घेतला. निवडणूकीच्यावेळी डॉ.आंबेडकरांना पराभूत करण्यासाठी व त्यांचे कार्य धुळीत मिळविण्यासाठी हे पुढारी एखाद्या चांभारास स्वत:च्या पक्षामार्फत बाबांच्या विरुध्द उभे करत व त्यास निवडून आणत. या अस्पृश्यांच्या अज्ञानामुळे

व त्यांच्या संकुचित वृत्तीमुळे हिंदू समाजातील वर्णव्यवस्थेचे उच्चाटन पूर्णतया होऊ शकले नाही. या सर्व सामाजिक परीस्थितीवर या पुढा-यांच्या वृत्तीवर मुक्ताबाईनी प्रकाश टाकला आहे. एकंदरीत त्यावेळी सवर्ण व अस्पृश्य यांचे असणारे ताणतणावाचे संबंध कसे होते व दलित समाजास कसे यातनामय जीवन जगवे लागत होते हे या आत्मकथातून पाहावयास मिळते.

प्रकरण तीन मध्ये अस्पृश्य वर्गातील प्रथमच शिक्षणाचा लाभ झालेल्या शांताबाई कांबळे यांच्या जीवनाची जडाण घडण कशी झाली याचा आढावा घेतला आहे. दारिद्र्याची शिकार झालेल्या कुटुंबात शांताबाईचे बालपण गेले. शिक्षण घेत असताना एक महाराची मुलगी म्हणून त्यांना बाजूला बसण्याची वेळ आली. तर त्यावेळी शिक्षणापासून वंचित असणा-या स्त्रियाकडून अवहेलनाही पदरात पडली. यावेळी त्यांच्या नातेवाईकांनी व मुख्यत: आई वडीलांनी शांताबाईना मोलाची साथ दिली. त्याच बरोबर पाटील मास्तरानीही त्यांना मदतीचा हात दिला. शांताबाई सातवी पास झाल्या. करगणीच्या कांबळे मास्तरांशी विवाह झाला. पण कांबळे मास्तरांनी दुसरा विवाह केल्याने शांताबाई पुन्हा दु:खाच्या खाईत लोटल्या गेल्या. पण शिक्षणाने संस्कारीत झालेल्या शांताबाईनी पती परमेश्वर असे मानून परंपरावादी जीवन जगणा-या इतर स्त्रियाप्रमाणे त्या जीवन जगल्या नाहीत. स्वत:च्या हिंमतीवर त्यांनी स्वत:चे जीवन घडविण्याचा विचार केला. शिक्षणामुळे त्यांना शिक्षिकेची नोकरी मिळाली. अनेक ठिकाणी बदली, त्यात जातीयतेची बंधने याचा त्यांना फारच त्रास झाला. पण त्यांनी जिद्द सोडली नाही. स्वत:च्या नोकरीशी त्या प्रामाणिक राहिल्या. ज्या कडलास गावच्या माणसांना प्रथम शांताबाई शिक्षिका म्हणून नको होत्या त्याच माणसांना याच शिक्षिका आपल्या मुलांना शिकवायला हव्यात असे वाटण्याइतपत त्यांनी चांगले शैक्षणिक कार्य केले. कांबळे मास्तरांनी केलेली दुसरी पत्नी मयत होताच ब-याच वर्षांनी शांताबाईच्या आयुष्यात सुखाचे दिवस आले. त्यांच्या आयुष्यात डॉ.आंबेडकरांचे

दर्शन ही बाब महत्वपूर्ण ठरली. त्यांच्या कार्याची त्यांना जाणीव आली. त्यामुळे १९५७ साली करगणीच्या लोका बरोबर त्यांनी धर्मान्तर केले. शिक्षणाकडे केवळ पोटार्थी भावनेने न पाहता समोर बसलेल्या विद्यार्थ्यांच्या जीवनाचा विचार करुन त्यांच्यासाठी अति कष्ट त्यांनी घेतले. आपल्या समाजास अक्षराची ओळख व्हावी, त्यांच्यातील अज्ञान नाहीसे व्हावे या विचाराने या कांबळे जोडप्याने अस्पृश्य समाजात प्रौढ शिक्षणाचे वर्ग घेतले. येथील जास्तीत जास्त मुले शिकावीत यासाठीही प्रयत्न केले. त्याच बरोबर करगणी येथे सातवीच्या केन्द्र परीक्षेसाठी आसपासच्या खेड्यातून येणाऱ्या अस्पृश्य मुलांच्या जेवणाची व्यवस्था स्वत:च्या घरी केली. हे त्यांचे सामाजिक कार्य कौतुकास्पद आहे. अनेक यातना सहन करत वाटचाल करणाऱ्या शांताबाईच्या या कष्टास शेवटी चांगले फळ आले. त्यांना शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून बढती मिळाली. एकंदरीत या जीवन प्रवासात त्यांना सुखाचे दिवस आले. असा स्वत:चा विकास करुन घेत असतानाच स्वत:च्या मुलांना सुशिक्षित व उच्चशिक्षित केल्याने त्यांनाही चांगल्या नोकऱ्या मिळाल्या. या कष्टमय अशा जीवन प्रवासात शांताबाईंना ज्यांचा ज्यांचा हातभार लागला त्यांची व्यक्तिचित्रे त्यांनी मनोभावे रेखाटली आहेत. एकंदरीत शिक्षणाची प्रथमच संधी मिळालेल्या दलित स्त्रीची ही जीवन कहाणी आहे. त्यांनी स्वत:चा आत्मशोध घेत असताना संपूर्ण अस्पृश्य समाजाचा व सामाजिक परिस्थितीचाही आत्मशोध घेतलेला आहे. आणि स्वत:स आलेले अनुभव प्रांजळपणे त्यांनी मांडलेले आहेत.

प्रकरण चार मध्ये दलित जातीत जन्मलेल्या परंतु दलित जीवनाचे संस्कार न झालेल्या मुक्ता सर्वगोड यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला आहे. लहानपणी त्यांच्या बालमनावर त्यांच्या वडिलांनी, समाजातील लोकांनी अस्पृश्यांच्या जीवनातील दु:ख कसे असते किंवा याना वागणूक कशी दिली जाते याचे संस्कार केलेले होते. त्यांनाही लहानपणी शाळेत गेल्यावर याबाबत स्वानुभव आलेले असतात. मुक्ताबाईचा विवाह होताच त्या मुंबईत स्थायिक झाल्यावर

महिला मंडळामार्फत सामाजिक कार्यात सहभागी होतात. केवळ हौस म्हणून हे कार्य करत असताना समाज सेवेत होणाऱ्या चुका, समाज सेवेच्या खऱ्या गरजा व त्यातील उणीवा त्यांनी पटवून दिल्या. मुंबईत राहाणाऱ्या बी.डी.डी. चाळीतील अस्पृश्य वर्गाच्या व दलित स्त्री च्या जीवनाचे निरीक्षण करुन त्यांच्यात विकास घडवून आणण्याच्या आकांक्षेने तेथे साक्षरतेचे वर्ग, सुरु केले. त्यांच्या जीवनाशी एकरुप होऊन त्यांची सुखदु:खे समजावून घेतली. मागास स्वरुपाच्या त्यांच्या जीवनात जागृतावस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण लवकरच मुंबईत जातीय दंगे निर्माण झाल्याने त्यांना हे कार्य सोडून इस्लामपूरला पतीच्या बदली मुळे यावे लागले. मुंबई सोडल्यावर दहा वर्षे त्यांनी खेडयात राहून तेथील दलित वर्गाचे व मुख्य म्हणजे दलित स्त्रीचे जीवन जाणून घेतले. पुढे पुण्यात आल्यावर तेथील झोपडपट्टीचे जीवन त्यांनी स्वत: पाहिले. झाडू काम करणाऱ्या, कांचा-पत्रे, कागद विकणाऱ्या या स्त्रिया पुरुषी वर्चस्वाखाली बकाल स्वरुपाचे जीवन जगत होत्या. स्वत:च्या कुटुंबासाठी सतत धडपडत होत्या. यांचा विकास करण्यासाठी व स्त्री मध्ये स्वाभिमान निर्माण करण्यासाठी मुक्ताबाई नी या झोपडपट्टीत ठिकठिकाणी प्रौढ शिक्षणाचे, शिवणकामाचे, हस्तकलेचे इत्यादि वर्ग सुरु केले. सरकारकडून मिळणाऱ्या सवलती त्यांना समजून सांगितल्या. त्यांच्यात स्वावलंबनाची भावना रुजविण्याचा प्रयत्न केला. अर्धवट शाळा सोडून फिरणाऱ्या मुलांना इंजिनिअरिंगमध्ये तयार होणाऱ्या वस्तूंचे प्रदर्शन भरवून त्यांच्या मनात काम करण्याची प्रेरणा निर्माण केली. कोणत्याही मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी असो किंवा कार्यक्रमाच्यावेळी असो मुक्ताबाईंनी या अस्पृश्य वर्गाची कैफियत मांडून यांच्या जीवनाचा विकास करण्याचा प्रयत्न केला. तत्कालिन कॉंग्रेस पक्ष, पुढारी, यांचे वाभाडे काढले. त्यांच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. मुक्ताबाई फक्त टीकाच करत नव्हत्या तर सामाजिक सुधारणेसाठी पर्यायही सुचविणाऱ्या होत्या. अस्पृश्य समाजापासून ते तुरुंगातून सुटून आलेल्या कैद्यांना कसे सुधारावे या सर्वांवर त्यांनी पर्याय सुचविलेले पाहावयास मिळतात. जाती भेदामुळे, सामाजिक विषमतेमुळे या अस्पृश्य वर्गाच्या विकासाची

मिटलेली कवाडे उघडण्याचा प्रयत्न मुक्ताबाईंनी शहरात व खेड्यात केलेला आहे. अस्पृश्या बरोबरच गावरहाटीत वाढणारे अनेक बलुतेदार त्यांच्याही दु:खावर प्रकाश टाकून यांना कशी वागणूक दिली जात होते ते सांगून जातात. पण हे एवढं करत असताना, या तळागाळातील वर्गाला वर आणण्याचा प्रयत्न करत असतांना मुक्ताबाईंना बक्षिस काय मिळाले, तर ही बाई कॉंग्रेसची, ही दलनी आहे, हिला आमच्यात काम करु देऊ नका. असा कोकणी स्त्रियांनी व लोभी पुढा-यांनी यांच्यावर धोबी शिक्का मारुन त्यांच्या सामाजिक कार्यात वारंवार अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आपल्याच समाजाच्या विकासाच्या आड येणा-या याच पुढा-यांच्या व स्त्रियांच्या वृत्तीकडे पाहून मुक्ताबाई व्यथित होतात. पण आपल्या हातून या लोकांचा विकास व्हावा प्रामाणिक इच्छेने पुन: कामास लागतात. झोपडीत राहाणा-या या वर्गास सरकारी सवलत मिळवून देऊन त्यांना घरे बांधून देतात. तेव्हा शेवटी का असेना मुक्ताबाईच्या कार्यास फळ आले. कारण घरे बांधून देण्यासाठी मुक्ताबाईंनी सोलापूरला जी सोसायटी निर्माण केली ती आज सुध्दा मुक्ताबाईंची सोसायटी म्हणून अडाणी लोक ओळखतात. सामाजिक सुधारणा हौस म्हणून करत असताना लेखिकेच्या मनातील सामाजिक जाणिव जागी असल्याचे दिसते. सामाजिक प्रश्न घिसाडया - सारखे न हाताळता त्याची पार्श्वभूमी समजावून घेऊन सोडवायला हवेत. या जाणीवेने मुक्ताबाईंनी मांजरीच्या ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटर मध्ये शिबिर आयोजित केले. शिक्षकांच्या मनात सामाजिक कार्याची जाणीव निर्माण केली. त्याच बरोबर येथेच दुसरे शिबिर घेऊन तेथील लोकांचे जीवन जाणून घेतले व त्यांच्या झोपडीमध्ये स्वच्छतेचे काम केले . अशा या समाज सेविकेला बाबा आमटे, साधनाताई आमटे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचेच व त्याचे दर्शन होणे म्हणजे त्याच्या समाजसेवी वृत्तीला व मागासलेल्या दलित समाजासाठी मिटलेल्या कवाडांना उघडण्याची प्रेरणा प्राप्त होण्यासारखेच होते. बाबा आमटे यांच्या कार्याची जाणीव ठेवून मुक्ताबाईंनी त्यांच्या आनंदवनास भेट दिली. बाबा आमटे यांचे कार्य पाहून त्यांचे अंत:करण भरुन आले कारण समाजाने

ज्यांच्या जगण्याची कवाडे बंद केली होती अशा कित्येकांना बाबा आमटे यांनी आसरा दिला होता व त्यांच्या जीवनाची कवाडे उघडण्याचा प्रयत्न करून त्याना स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग दाखवत होते. एकंदर या अस्पृश्य समाजाची सामाजिक व मानसिक दास्यातून मुक्तता होऊन विषमता रहित समाज रचना व्हावी, माणसामाणसात बन्धुत्वाची भावना निर्माण व्हावी ही वर्गविरहित समाज रचनेचे मार्क्सचे विचार मुक्ताबाईच्या मनावर बिंबलेले आहेत हे पाहावयास मिळते.

समारोप ---

या दोन्ही आत्मकथनातून या दलित स्त्रीयांनी तत्कालिन सामाजिक परिस्थिती दलित स्त्री जीवन यावर प्रकाश टाकत असतानाच एकंदर दलित समाजाचे जीवन प्रकाशात आणले आहे. सामाजिक अन्यायास बळी पडलेल्या या दोन्ही लेखिकेंनी आपल्या गतायुष्यातील कहाणी सांगत असताना त्यात त्यांच्या भावनांचे निर्माण झालेले वेगवेगळे पदर पाहावयास मिळतात. स्वत:च्या जीवनाचा आत्मशोध घेता घेता स्वसमाज व स्वेतर समाज यांचाही वेध घेण्याचा प्रयत्न यांनी केला. त्यामुळे या आत्मकथनाना एक सामाजिक मूल्य प्राप्त झालेले आहे. त्यामुळे मराठी स्त्री आत्म कथनाला आपल्या समृध्द अनुभवांनी योगदान देणारी अशीही दलित स्त्री आत्मकथने बनली आहेत.

## संदर्भ ग्रंथ सूची - (अ)


अग्नीहोत्री द.ह. - अभिनव मराठी-मराठी शब्दकोश, १९८३.

कवठेकर बाळकृष्ण - दलित साहित्य एक आकलन,
श्री अनिलकुमार मेहता, कोल्हापूर, १९८१.

कांबळे शांताबाई कृष्णाजी - माझ्या जल्माची चित्तरकथा,
सुगावा प्रकाशन, पुणे, १९९०.

कुलकर्णी गो.म. १) - दलित साहित्य प्रवाह आणि प्रतिक्रिया
प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९८६.

२) - मराठी साहित्यातील स्पंदने,
सुपर्ण प्रकाशन, पुणे, १९८५.

कुलकर्णी मधु - ललित साहित्यातील आकृतीबंधाची
जडण-घडण

कुसेर-कुलकर्णी-आरती - दलित स्वकथने : साहित्यरुप,
विजय प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर, १९९१.

खैरमोडे चांगदेव भवानराव - डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीची
पार्श्वभूमी,
श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८८.

जोशी प्र.न. - आदर्श मराठी शब्दकोश, १९७०.

नलगे चंद्रकुमार व पानतावणे गंगाधर १) - दलित आत्मकथन,
सुरेश एजन्सी, पुणे, १९८६.

२) - स्त्री आत्मकथन, सुरेश एजन्सी, पुणे, १९९०.

निंबाळकर वामन - दलित साहित्य स्वरुप व भूमिका, प्रबोधन प्रकाशन,नागपूर,१९८६.

पवार गो.मा. व हातकणंगलेकर म.द. - मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप पॉप्युलर प्रकाशन,नागपूर,१९८६ । १९०७.

पाटील मृणालिनी,लांजेकर ज्योती व धनकर मदन समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह, विजय प्रकाशन, सीताबर्डी नागपूर,१९८५.

भालेराव विमल - आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे - एक अभ्यास साहित्य प्रसार केन्द्र,सीताबर्डी,नागपूर-१९८६.

वडेर प्रल्हाद - अनुभव आणि आकार मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,१९७९.

सर्वगोड मुक्ता - मिटलेली कवाडे, चेतश्री प्रकाशन,अमळनेर,१९८३.

(ब) <u>संदर्भ नियतकालिक सूची</u> ---

आलोचना - फेब्रुवारी, १९८७.
सत्यकथा - जानेवारी,१९८०.
महाराष्ट्र साहित्य पत्रिका - दिवाळी विशेषांक -- जानेवारी १९८०